थोडक्यात...

अबॅकस आणि वैदिक गणित याविषयी व्याख्यान

जळगाव । येथील गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल तर्फे अबॅकस आणि वैदिक गणित याविषयी ए.व्ही.अक्डेमीचे संचालक समर्थसिंग पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून माजी महापौर विष्णू भंगाळे आणि अध्यक्ष दिनेश थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना समर्थसिंग पाटील यांनी अबॅकस आणि वैदिक गणित यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविण्यास उपयुक्त ठरतात. गणित सहज वाचून सोडवता येतात असे सांगितले. नंतर त्यांनी १०० पर्यंतचे पाढे, वर्ग, मोठे गुणाकार चुटकीसरशी सोडविण्याचे प्रत्यक्ष करून दाखविले.

मोबाईलवरुन बोलण्याच्या कारणावरुन एकास लोखंडी रॉडने मारहाण

चाळीसगाव । तालुक्यातील कृष्णानगर तळेगांव गावात मोबाईलवरुन बोलण्याच्या कारणावरुन एकाला लोखंडी रॉडने मारहाण करुन दुखापत केली आहे. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, संतोष गुलाब राठोड (वय ४७) हे दि. ०४ रोजी रात्री ०९ वाजेच्या सुमारास घराच्या ओट्यावर परिवारसोबत बसलेले असतांना, त्याच्या शेजारी राहणारे सोपान आनंदा राठोड हा कोणाशी तरी फोनवर मोठ मोठ्याने बोलत होता. तेव्हा संतोष राठोड यांना देखील नातेवाईकाचा फोन आल्याने ते घरा समोरील रस्त्यावर उतरुन नातेवाईका सोबत बोलत असतांना, सोपान आनंदा राठोड याने त्याचा फोन बंद करुन, संतोष राठोड कडे रागात येवुन, ते बेसावध असतांना त्याने अचानक संतोष राठोड यांच्या डोक्यात लोखंडी रॉड मारुन दुखापत केली.

तसेच तु मला शिवीगाळ का करतो आहे, असे बोलत होता, तर संतोष राठोड हे त्याला समजवित होतो कि मी माझ्या नातेवाईकासोबत फोनवर बोलत होतो, तुला काही तरी गैरसमज झाला आहे. परंतु सोपान राठोड हा रागात असल्याने त्याने बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्याने लगेच संतोष राठोड यांच्यावर लोखंडी रॉड ने दुसरा वार केला. तो लोखंडी रॉड माझ्या डाव्या व उजव्या हाताच्या कोपराजवळ लागुन संतोष राठोड यांना दुखापत झाली आहे. याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला संतोष राठोड यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

कोयता घेऊन दहशत करणाऱ्या इसमास अटक

चाळीसगाव । चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने शहरातील भडगांव रोडवरील आंबेडकर नगर भागात लोखंडी कोयत घेऊन फिरणाऱ्या इसमास अटक केली आहे. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला गुन्हां दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि. ४ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास चाळीसगाव शहर पोलीस ठाणे हद्दीतील भडगाव रोड, माता रमाबाई आंबेडकर नगर परिसरात एक व्यक्ती हातात लोखंडी कोयता घेऊन दहशत निर्माण करत असल्याची माहिती चाळीसगाव पोलिसांच्या पथकास मिळाल्यानंतर पोलीसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित इसमाला अटक केली आहे. पोहेकॉ अजय अशोक पाटील व पोना भुषण मांगो पाटील यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळी धाव घेऊन कारवाई केली. तेथे एक इसम हातात कोयता घेऊन फिरताना आढळून आला. त्याचे नाव दादाभाऊ वाल्मिक अहिरे (वय ३० वर्षे, रा. भडगाव रोड, माता रमाबाई आंबेडकर नगर, चाळीसगाव) असे असल्याचे निष्पन्न झाले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे सुमारे ३०० किमतीचा, २० सेमी लांब, ५ सेमी रुंद व एक बाजूने धार असलेला लोखंडी कोयता मिळून आला. त्याच्याकडे सदर शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. सदर इसमाविरुद्ध मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी लागू केलेल्या शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करीत असताना तो मिळून आल्याने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पो. ह. पंकज पाटील हे करीत आहेत.

प्रशासनाची सतर्कता, बालविवाह रोखला; नातलगांचे समुपदेशन अन् कायद्याची माहिती

अमळनेर । प्रतिनिधी

जळगाव जिल्हा धरणगाव येथे, ४ मे २०२५ रोजी धरणगाव शहरात चोपडा येथील १६ वर्षीय मुलगी आणि धरणगाव येथील २२ वर्षीय मुलाचा विवाह दिनांक ५ मे २०२५ रोजी धरणगाव येथे होणार होता. मात्र, हळदीचा कार्यक्रम ४ मे २०२५ सायंकाळी निश्चित असताना, आधार बहुउद्देशीय संस्था अमळनेर येथील प्रतिनिधी यांना गोपनीय माहिती मिळाली. अमळनेर चे उपविभागीय अधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांना देण्यात आली.प्रांत अधिकारी यांच्या सूचनेनुसार मुलगी अल्पवयीन असल्याने आवश्यक कारवाई करण्यात आली.

नायब तहसीलदार लक्ष्मण सातपुते ग्राम महसूल अधिकारी राहुल ढेरंगे पोलिस उपनिरीक्षक संतोष पवार, पोलिस कॉन्स्टेबल सुमित बाविस्कर, आणि पोलिस नाईक उमेश पाटील यांच्या उपस्थितीत मुलीच्या आई-वडिलांना व इतर नातलगांना बाल विवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती देऊन समुपदेशन केले गेले.

अल्पवयीन मुलीच्या आई-वडिलांना लेखी समजही देण्यात आली. त्यामुळे ५ मे २०२५ रोजी होणारा बालविवाह थांबविण्यात आला आहे.

सदर कारवाई उपविभागीय अधिकारी मनीष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी आणि पोलिस निरीक्षक श्री पवन देसले तसेच आधार संस्थेचे अध्यक्ष डॉ.भारती पाटील संचालिका रेणू प्रसाद ,जिल्हा प्रकल्प समन्वयक आनंद पगारे,निवेदिता ताठे, मोहिनी धनगर यांच्या सहकार्याने करण्यात आली.

अमळनेर नगरपरिषद अलर्ट मोडवर

शहरातील मुख्य रस्त्यालगतची ३८ अतिक्रमणे जमीनदोस्त

अमळनेर । प्रतिनिधी

पालिकेच्या भूखंड १२३ मधील मुख्य रस्त्यालगतची ३८ अतिक्रमणे पालिकेने काढण्यास सुरुवात करताच दुकानदारानी स्वतःहून काढून घेतली आहेत. यामुळे भाजीपाला मार्केट कडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतुकीचा मार्ग मोकळा होणार आहे. नागरिकांनी पालिकेच्या भूमिकेचे स्वागत केले आहे.

पालिकेच्या मालकीच्या असलेल्या १२३ भूखंडात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली होती. त्यात मुख्य रस्त्यावर दुकाने अतिक्रमित असल्याने सामान्य नागरिकांना मुख्य बाजारपेठेत भाजीपाला, किराणा व दैनंदिन लागणाऱ्या वस्तू खरेदीला जाताना त्रास सहन करावा लागत होता. पालिकेने १२३ मध्येच ८६ व्यापारी गाळे बांधून अतिक्रमण काढण्याचा प्रयत्न केला. मात्र ३८ दुकानदारांनी तात्पुरत्या स्वरूपात आपली दुकाने जैसे थे ठेवली होती. व्यापारी गाळे बांधले जाऊनही अतिक्रमण काढले गेले नाही. प्रचंड वाहतुकीची कोंडी होत असल्याने अखेर पालिकेने काही दिवसांपूर्वीच या दुकानदाराना नोटिसा दिल्या होत्या. तरीही अतिक्रमण हटवले नाही. चार दिवसांपूर्वी तोंडी सूचना देण्यात आल्या. दुकानदारांनी प्रतिसाद न दिल्याने अखेर मुख्याधिकारी तुषार नेरकर , अभियंता डिगंबर वाघ , अतिक्रमण विभाग प्रमुख राधेश्याम अग्रवाल , अविनाश बिऱ्हाडे , जितू चावरीया ,विशाल सपकाळे , सुनील संगेले , बुद्धाभूषण चव्हाण , जतीन चव्हाण , कमलेश पाटील, विकास बिऱ्हाडे यांचे पथक सकाळी १२३ मध्ये दोन जेसीबी मशिनसह पोहचले आणि अतिक्रमण काढायला सुरुवात करताच दुकानदारांनी मालाचे व दुकानांचे नुकसान होऊ नये म्हणून स्वतःहून अतिक्रमण काढायची तयारी दर्शवली. दुकानदारांनी आपापली दुकाने खाली करून दुकानांचे पत्रे ,अँगल काढणे सुरू केले. सायंकाळी नन्तर पालिकेने पक्के ओटे व बांधकाम पुन्हा तोडून साफ केले.

शहराचा वाढता विस्तार पाहता वाहतुकीची सर्वत्र कोंडी होत असल्याने पालिकेने नागरिकांच्या सुरक्षेसाठी व वाहतूक सुरळीत होण्यासाठी गांधीनगर , झामी चौक आणि त्यांनतर १२३ भूखंडातील अतिक्रमणे काढल्याने नागरिकांनी स्वागत केले आहे. पालिकेने या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून दक्षता बाळगावी अशीही मागणी होत आहे.

कृत्रीम बुद्धीमत्तेमुळे जग माहितीच्या विस्फोटाच्या जवळ : - डॉ. सोमनाथ वडनेरे

जळगाव । प्रतिनिधी -

कृत्रिम बुद्धीमत्ता, आर्टिफिशीयल इंटेलिजन्सचा विविध क्षेत्रातील वाढता वापर पहाता माहितीच्या गतीमान आदान प्रदानामुळे जग माहितीच्या विस्फोटाच्या जवळ पोहचला असून अनेक मनोसामाजिक प्रश्न यामुळे भविष्यात होत आहेत तथापि एआयच्या अविवेकी आणि अनियंत्रीत वापराला आध्यात्मिक बुद्धीमत्तेद्वारे प्रभावी नियंत्रण शक्य असल्याचे प्रतिपादन डॉ. सोमनाथ वडनेरे यांनी केले.

जागतिक शांती आणि सदभावनेचे अग्रदुत म्हणून माध्यमांची भूमिका या विषयावर ब्रह्माकुमारीज् मीडिया विंग तर्फे ज्ञानरोवर, आबू येथे राष्ट्रीय मीडिया संमेलनाचे आयोजन केले होते. त्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे डॉ. सोमनाथ वडनेरे यांनी ' सोशल मीडियात कृतिम बुद्धीमत्तेचा वापराचे फायदे आणि तोटे' या विषयावर मुख्य संबोधन केले. ते पुढे म्हणाले की, विविध क्षेत्रातील एआयच्या वापराबरोबर प्रत्येक सोशल मीडियाने देखील याचा वापर सुरु केला आहे. तथापि प्रत्येक तंत्रज्ञानाचा वापरामागे मानवीय मूल्य आणि संवेदना असल्यास त्याचाकडून नुकसान होत नसते, सोशल मीडियामध्ये डिफेक व्हिडिओ, हनी ट्रॅप, आदिसारख्या सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून अनियंत्रीत आणि अविवेकी वापर त्यास कारणीभूत आहे. एआयला विवेकी आणि नियंत्रीत वापरासाठी आध्यात्मिक बुद्धीमत्ता महत्वाचे ठरते.

सोशल मीडियाचा वापर करतांना अतिशय काळजी घेणे गरजेचे आहे. तीन दिवशीय संमेलनात देशभरातील अनेक माध्यमतज्ज्ञांनी यात सहभाग नोंदविला. याप्रसंगी बी.के. निकुंज, राष्ट्रीय समन्वयक, मीडिया प्रभाग, मुंबई, बी.के. कोमल, संपादक, मधुबन न्यूज चैनल, आबू, कबीर झारीवाला, पोडकास्टर, दिल्ली, डॉ. एस. के. वर्मा, सहायक संचालक, दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण, जामीया मिलीया इस्लामीया विद्यापीठ, दिल्ली, डॉ. सुनिता, आबू, डॉ. नंदिनी द्विवेदी, अहमदाबाद यांनी समायोचित मनोगते व्यक्त केलीत.

चाळीसगाव येथे सलोखा संवादाचा उपक्रम

चाळीसगाव । प्रतिनिधी

चाळीसगांव येथे लोकशाहीवादी संघटनांचा सलोखा संवादाचा उपक्रम राबविण्यात आला, यात देशातील हिन्दु-मुस्लीम बांधवामधील सलोखा कायम राहवा यासाठी जनजागृती करण्यात आली.

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने देशभरात संतापाची लाट पसरली आहे. अनेक सामाजिक संघटनांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे.

भारत देशात हिंदू मुस्लिम तेढ निर्माण व्हावी, यासाठी दहशतवाद्यांनी हा हल्ला केला असून देशातील शांतताप्रिय हिंदू मुस्लिम बांधव दहशतवाद्याचे मनसुबे कधीही पूर्ण होऊ देणार नाही, देशात शांतता, सौहार्दचे वातावरण कायम राहावे. यासाठी चाळीसगांव शहरातील लोकशाहीवादी संघटनांनी एकत्र येत हिंदू मुस्लिम, शीख, ईसाई बांधवांमध्ये पूर्वीप्रमाणे सलोखा कायम रहावा. यासाठी सलोखा संवाद हा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात धार्मिक सलोखा व एकतेचे फलक हात घेऊन जनजागृती या उपक्रमातंर्गत करण्यात आली.

या उपक्रमात प्रमोद पाटील, प्रदीप देशमुख,नितीन परदेशी,देवेद्र पाटील, सागर नागणे, गोकुळ पाटील, प्रा.किरण पाटील, प्रा.चंद्रकांत ठाकरे, सय्यदसाहब, अमजद खान, सुजय देशमुख, सचिन पाखले, मांगीलाल मोरे, दिलीप चव्हाण यांच्यासह संविधान प्रेमी नागरिक सहभागी झाले होते. देशात जातीय व धार्मिक सलोखा कायम राखण्यासाठी चाळीसगांव येथील लोकशाहीवादी संघटनांनी एकत्र येत राबविल्या उपक्रमांते नागरिकांनी सहभाग नोंदवत कौतुक केले.

अजिंठा दीर्घ काव्य अभिवाचनाने रसिक मंत्रमुग्ध

रोटरी क्लब व मराठी नाट्य परिषद जळगाव यांचा उपक्रम

जळगाव । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब जळगाव व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या जळगाव जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा दिनानिमित्ताने ना. धो. महानोर लिखित अजिंठा या दीर्घ काव्याचे अभिवाचन आयोजित करण्यात आले होते.

वाचक स्वर डॉ. शमा सुबोध, सुबोध सराफ आणि अदिती कुलकर्णी यांचा होता तर गायक स्वर ड.आनंद मुजुमदार व कॅप्टन मोहन कुलकर्णी यांचा होता.

कार्यक्रमास मराठी नाट्य परिषदेच्या जळगाव शाखेचे उपाध्यक्ष ड. संजय राणे, रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष ड. सागर चित्रे व मानद सचिव पराग अग्रवाल यांची उपस्थिती होती.

१९ व्या शतकाच्या मध्यकालातील ब्रिटिश चित्रकार रॉबर्ट गिल व अजिंठाच्या पायथ्याच्या गावातील ग्रामीण तरुणी पारो यांची विलक्षण प्रेम कहाणी कविवर्य ना. धो. महानोर यांनी अजिंठा या दीर्घ काव्यातून चितारली आहे. वाचक कलाकारांनी कथेच्या अनुषंगाने अतिशय भावपूर्ण असे अभिवाचन केले.

यातील काव्यांना कॅप्टन मोहन कुलकर्णी यांनी सुंदर अशा चाली लावून त्यांच्यासह सहकलाकारांनी त्या सादर केल्यात. त्यांच्या बासरीचे सूर व आनंद मुजुमदार यांचे पार्श्वसंगीत यांने कार्यक्रमाची उंची वाढवली. सुमारे तासभर चाललेल्या या कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध झाले. एक आगळीवेगळी कलाकृती उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात कलाकार यशस्वी झाले.

पारोळा राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाचे यश

महाविद्यालयाचा निकाल ९१.६७%, विज्ञान शाखा ९७.९७%, कला ७५.२२%

पारोळा । प्रतिनिधी

येथील राणी लक्ष्मीबाई कनिष्ठ महाविद्यालय पारोळा, इयत्ता बारावी विज्ञान शाखेत २९५ व कला शाखेत एकूण ११३ विद्यार्थी बसलेले होते,त्यात विज्ञान शाखेतून २८९ विद्यार्थी पास झाले तर कला शाखेतून ८५ विद्यार्थी पास झाले. महाविद्यालयाचा निकाल ९१.६७% टक्के लागला असून त्यात विज्ञान शाखेचा निकाल ९७.९७% तर कला शाखेचा निकाल ७५.२२% टक्के लागला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन वसंतराव मोरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.आर.पाटील उपप्राचार्य तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विज्ञान शाखेत

प्रथम - प्रणव वना महाजन = ८८.५०%
द्वितीय - सोनवणे प्राची प्रमोद = ८७.१७%
व शिंपी हर्षदा गणेश = ८७.१७%
तृतीय - पाटील विशाखा हरी ८२.१७%
क्रमांक मिळवला तसेच
कला शाखेत
प्रथम - लोहार साक्षी गजानन = ८०.३३%
द्वितीय - पाटील खुशी गजानन = ७६.५०%
तृतीय - सोनार दीक्षा सुनील = ७५%

एस.के. पवार विद्यालयाचा बारावीचा निकाल ९६ टक्के निकाल

नगरदेवळा । वार्ताहर -

येथील एस के पवार विद्यालयाचा निकाल सायन्स ९९ .४९ टक्के,आर्ट ९८.३३ टक्के,तर किमान कौशल्य शाखेचा ९१.६७ टक्के लागला असून विद्यालयाचा निकाल ९६.५० टक्के लागला. सायन्स शाखेत चव्हाण सम्यक किरण,गहीलोत रक्षित मंगल सिंग, पाटील संचाली दिनेश,पाटील कृष्णा बापूराव, पाटील वैष्णवी संदिप अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतिय चौथ्या पाचव्या क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले.तर आर्ट शाखेतून पाटील नेहा गणेश, चैताली बापू शिंपी,दुबे यश किरण,पाटील शितल रविंद्र, पाटील हर्षद राजेंद्र हे विद्यार्थी विद्यार्थिनी प्रथम द्वितीय तृतीय चौथ्या, पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले,तसेच कीमान कौशल्य

शाखेतून शेख इद्रस शेख भिकन, पाटील गणेश नारायण, सोनवणे ऋषीकेश वाल्मिकी, भोई, सोमनाथ पिंटू, मिस्तरी देवेंद्र सुनील विद्यार्थी विद्यार्थिनी प्रथम द्वितीय तृतीय चौथ्या पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचे चेअरमन सचिव, संचालक मंडळ,प्राचार्य,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद तर्फे अभिनंदन करण्यात येत असून भावि वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहे.